जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्रमांक :- २२०** **दिनांक :- १८/०८/२०२१**

# कारमधील टेप चोरी करणाऱ्या गुन्हेगारांना जेरबंद करण्यात यश-मध्यवर्ती गुन्हे शाखा यांची कामगिरी.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत कारची काच फोडुन कार टेप चोरी करणाऱ्या गुन्हेगारांनी धुमाकुळ घातला होता. सदर गुन्हयाच्या प्रमाणात दिवसें दिवस वाढ होत चालल्याने त्यांना प्रतिबंध करणाच्या अनुषंगाने व दाखल गुन्ह्यांची उकल करण्याबाबत वरिष्ठांनी सुचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे मध्यवर्ती गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी अथक परिश्रम करुन गुन्हे घडलेल्या घटनास्थळी भेट देवुन, तांत्रिक बाबींचा वापर करुन आरोपी निष्पन्न केले. तसेच अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्या आरोपींची गुप्त बातमीदारा मार्फत माहिती प्राप्त केली.

प्राप्त गोपनीय माहितीच्या अनुषंगाने आरोपी नामे १) विनोद अशोक पवार २) अभिषेक अशोक पवार यांना वळसंग, जिल्हा- सोलापुर व पाटस, जिल्हा पुणे येथील पारधी वस्तीमधुन शिताफिने ताब्यात घेवुन त्याचेकडे गुन्ह्याबाबत तपास केला असता त्यांचा नवघर पो.स्टे. गुन्हा.रजि.नं. ४६२/२१ भादवि कलम ३७९,४२७,३४ या गुन्हयात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्यावरुन त्यांना दिनांक १२/०८/२१ रोजी अटक करुन दोन्ही आरोपींकडुन सोनी, पायोनिर, ऑनकॉड असे वेगवेगळ्या कंपनीचे असे एकुण १७ कारटेप व गुन्हे करतेवेळी वापरलेली १ मोटार सायकल असा एकुण ३,१३,०००/- रु. किंमतीचा मुददेमाल जप्त करुन अटक आरोपीकडुन एकुण १४ कार टेप चोरीचे गुन्हे उघडकीस आणले आहेत. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/ दत्तात्रय सरक हे करत आहेत.

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नं.व कलम |
|---|---|---|
| १. | नवघर | ४६२/२१ भादवि कलम ३७९,४२७,३४ |
| २. | काशिमीरा | ४६८/२१ भादवि कलम ३७९,४२७ |
| ३. | विरार | ३७०/२१ भादवि कलम ३७९ |
| ४. | विरार | ४००/२१ भादवि कलम ३७९,४२७ |
| ५. | विरार | ४०१/२१ भादवि कलम ३७९,४२७ |
| ६. | अर्नाळा | १३७/२१ भादवि कलम ३७९,४२७ |
| ७. | अर्नाळा | १९३/२१ भादवि कलम ३७९ |
| ८. | तुळींज | ८१६/२१ भादवि कलम ३७९,४२७ |
| ९. | माणिकपुर | २२८/२१ भादवि कलम ३७९,४२७ |
| १०. | तुळींज | १४६/२१ भादवि कलम ३७९,४२७ |
| ११. | तुळींज | ७७७/२१ भादवि कलम ३७९ |
| १२. | तुळींज | ५८३/२१ भादवि कलम ३७९,४२७ |
| १३. | वसई | १७३/२१ भादवि कलम ३७९,४२७ |
| १४. | नयानगर | ३८४/२१ भादवि कलम ३७९,४२७ |

तसेच सदरचे आरोपीचे तपासमध्ये ते पुणे, मुंबई, ठाणे, नवी मुंबई येथे दाखल गुन्हयात पाहिजे आरोपी असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरची कारवाई डॉ.श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे) व श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे शाखेचे पो.नि. राहुल राख, सपोनि/दत्तात्रय सरक, नितीन बेंद्रे, अमोल अंबवणे, पो.हवा./जनार्दन मते, पोना/शिवा पाटील, गोविंद केंद्रे, राजाराम काळे, सतिष जगताप, पोकॉ/राजेश श्रीवास्तव, महेश वेल्हे, सुशिल पवार, गजानन चव्हाण यांनी केली आहे.



-----oooo-----